आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत... २०१७ - २०१८.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : सकआ-२०१७/प्र.क्र.८३/आस्था २,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २९ जानेवारी, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सकआ-२०१७/२/ प्र.क्र.८३/ आस्था-२, दि.१८.१०.२०१७
२) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/आस्था-६/अस्थायीपदे/मंजुरी/२०१७-१८/का.६/ १९, दि.२.१.२०१८.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.८.१.२०१८.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील ६१७० अस्थायी पदांना दि.१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पुढे चालू ठेवण्यास संदर्भाधीन शासन निर्णय दि. १८.१०.२०१७ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ८.१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागाच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापुर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.१.१.२०१८ ते दि.२८.२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार सर्व प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

३. प्रस्तुत शासन निर्णयान्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या आस्थापनेवरील ६१७० अस्थायी पदांना पदांना दि.१.१.२०१८ ते दि.२८.२.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. तसेच प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दि.१०.४.२०१७ व शासन शुद्धीपत्रक दि. २१.९.२०१७ मधील इतर तरतुदी जशाच्या तशा लागू राहतील.

५. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.८.१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२९१५५५३०६४२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.01.29 16:02:18 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. आयुक्त, समाज कल्याण, पुणे

२. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
३. संचालक, विमुक्त जामी, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे
४. सर्व प्रादेशिक उपायुक्त,
५. सर्व सहाय्यक आयुक्त,
६. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
७. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपुर
८. अधिदान व लेखा अधिकारी,
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मंबई.
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. वित्त विभाग, व्यय -१४/ अर्थसंकल्प-१९, मंत्रालय, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (मावक /अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. निवडनस्ती (३ प्रती) आस्था -२.